# <u>वार्तापत्र</u>

कार्यालय पोलीस अधीक्षक,
गडचिरोली दि. १६/११/२०१७

## *अखिल भारतीय अंधश्रध्दा निर्मुलन समितीचे संस्थापक सचिव प्रा. श्याम मानव यांचे जिल्हावासीयांकरीता जाहिर व्याख्यान*

### *<u>जादुटोणा विरोधी कायद्यातील तरतुदींबाबत मार्गदर्शन</u>*

दिनांक १४/११/२०१७ रोजी गडचिरोली पोलीस दल व अखील भारतीय अंधश्रध्दा निर्मुलन समितीचे वतीने शिवाजी महाविद्यालयाचे परिसरात जनतेमध्ये जादुटोना कायदया बद्दल जनजागृती व्हावी याकरीता प्रा. श्याम मानव, संस्थापक सचिव अखिल भारतीय अंधश्रध्दा निर्मुलन समिती यांचे जाहिर व्याख्यान घेण्यात आलेले होते. सदर कार्यक्रमाकरीता मोठया संख्येने नागरिक उपस्थित होते.

प्रा. श्याम मानव सरांनी जगात जंत्र व मंत्र कुठेही नसुन स्वत:ला दैवी पुरुष म्हणून लोकांना फसविण्याऱ्या भौंदु बांबापासुन, भुतांची भिती दाखवून लुबाडणाऱ्यांपासून सावधान राहण्याचे आवाहन केले. तसेच जादुटोणा विरोधी कायद्यातील तरतुदी समजावून सांगितल्या.

या कार्यक्रमाचे उद्‌घाटन मा. अपर पोलीस अधिक्षक श्री. महेंद्र पंडीत यांनी केले तर प्रमुख अतिथी म्हणून श्री. झुरमुरे, अ.नि.स., पोनि. स्थागुशा श्री. प्रदिप लांडे, पोनि. श्री. नलावडे, मनोहर हेपट, श्री. बद्रे हे उपस्थित होते.

दरम्यान प्रा. श्याम मानव यांनी अंगठी व सोनसाखळी हवेत काढण्याचे प्रात्याक्षीक करुन दाखविले व अंधश्रध्देला बळी पडु नका असे आवाहन केले. याचबरोबर दिनांक १५/११/२०१७ रोजी जिल्हा पोलीस दलातील अधिकारी/कर्मचारी यांनाही प्रा. श्याम मानव यांनी जादुटोणा कायद्याबद्दल मार्गदर्शन केले व कायद्यातील तरतुदी समजावून सांगितल्या.


जाहीर व्याख्यान
(चमत्कार प्रात्यक्षिकांसह)
अंधश्रध्दा निर्मुलन व जादूटोणा विरोधी
मा. प्रा. श्याम मानव
मंगळवार, दि.




(चमत्कार प्रात्यक्षिकांसह)

